'पोलीस उपनिरीक्षक (अराजपत्रित) गट ब (मुख्य) परिक्षा - २०१६'

**A**

दि० २५ जून 2017

CODE : **KO9**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका-I**

**मराठी व इंग्रजी**

**वेळ : 1 ( एक ) तास**

**एकूण प्रश्न : 100**

**एकूण गुण : 100**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑ ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कंठ्य व्यंजने | (i) | त्, थ्, द्, ध्, न् |
| (b) | दंत्य व्यंजने | (ii) | च्, छ्, ज्, झ् |
| (c) | दंततालव्य व्यंजने | (iii) | ङ्, ञ्, ण्, न् |
| (d) | अनुनासिक व्यंजने | (iv) | क्, ख्, ग्, घ् |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (2) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

---

2. 'सूर्य अस्तास गेला' याचा व्यंग्यार्थ कोणता ?

(a) संध्या स्नानाची वेळ झाली.

(b) अभ्यासाची वेळ झाली.

(c) चोरी करण्याची तयारी करण्याची वेळ झाली.

(d) गुरे घरी नेण्याची वेळ झाली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व चूक (2) सर्व बरोबर

(3) फक्त (a), (b) बरोबर बाकी दोन्ही चूक (4) फक्त (a), (b) चूक बाकी दोन्ही बरोबर

---

3. खालील वाक्समूहातील म्हण ओळखा :

'ज्ञानेशराव, इथली माणसं साधी आहेत. त्यांना घोळात घ्यायला दोन गोड शब्द देखील पुरतील. दादागिरी करण्याची गरज नाही. गुळानं मरतो तिथे विष कशाला.' रामराव म्हणाले. ज्ञानेशरावानी मान डोलावली.

(1) घोळात घ्यायला गोड शब्द (2) गोड शब्द पूरे

(3) दादागिरी करण्याची गरज नसे (4) गुळानं मरतो तिथे विष कशाला

---

4. 'आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो'.

हे विधान कोणत्या वाक्याच्या प्रकारात येते ?

(1) केवलवाक्य (2) संयुक्तवाक्य (3) मिश्रवाक्य (4) विकल्पबोधक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

5. 'ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू' हे उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे ?

(1) उपमा (2) उत्प्रेक्षा (3) रूपक (4) अपन्हुती

---

6. 'स्तब्ध बसणे' हा अर्थ व्यक्त करणारा वाक्प्रचार असणारा पर्याय निवडा :

(1) अकाली पडलेली संसाराची जबाबदारी पार पाडताना सतीशचा उर फुटून गेला.

(2) सभेत श्रोत्यांची गर्दी पाहून वक्त्याचा उर दडपून गेला.

(3) प्रसंग उद्‌भवला असताना कच खाणे ध्येयवादी माणसाला योग्य नाही.

(4) युद्धाच्या काळात बरीच राष्ट्रे उद्ध्वस्त होतात.

---

7. 'सुतोवाच करणे' या वाक्प्रचाराचा समानार्थी वाक्प्रचार ओळखा.

(1) सोक्षमोक्ष करणे (2) सोंग करणे (3) समझोता करणे (4) ओनामा करणे

---

8. 'प्रज्ञा थंडीच्या मोसमात डिंकाचे -मेथीचे लाडू खात असते', - या वाक्याचा काळ ओळखण्यासाठी खाली दिलेल्या पर्यायातून योग्य तो पर्याय लिहा :

(1) रीतिभूतकाळ (2) रीतिवर्तमानकाळ (3) रीतिभविष्यकाळ (4) अपूर्ण वर्तमानकाळ

---

9. पुढीलपैकी कोणता शब्द कानडी भाषेतून मराठीत रूढ झाला आहे ?

(1) कांबळे (2) डबा (3) किडूकमिडूक (4) शिकेकाई

---

10. दिलेल्या वाक्समूहातून 'जळत्या घराचा पोळता वासा' या म्हणीचा अर्थ शोधून काढा.

(1) अंबरच्या आयुष्याचे पूर्ण नुकसान झाले.

(2) घरात-बाहेर सर्वत्रच त्याला त्रास होत आहे.

(3) अनेक संकटांतूनही त्यातल्या त्यात मार्ग काढण्याचा त्याने प्रयत्न केला.

(4) यापैकी एकही नाही

---

11. 'बंधुता' हा शब्द शब्दसिद्धिच्या कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) उपसर्गघटित (2) अभ्यस्त (3) प्रत्ययघटित (4) सामासिक शब्द

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**18.** पुढील विधाने वाचा.

(a) तो म्हणे वेडा झाला.

(b) राहू द्या तर मग!

वरील विधानातील अधोरेखित उद्‌गारवाचक अव्यये कोणत्या उपप्रकारातील आहेत ?

(1) संबोधनदर्शक (2) आश्चर्यकारक (3) व्यर्थ उद्‌गारवाचक (4) विरोधदर्शक

---

**19.** 'शीतोष्ण', 'आत्मोन्नती' हे शब्द शब्दसंधीच्या कोणत्या प्रकारातील आहेत ?

(1) स्वरसंधी (2) विसर्गसंधी (3) व्यंजनसंधी (4) यापैकी नाही

---

**20.** उपमेय असूनही ते उपमेय नाही, तर उपमानच आहे असे सांगितले जाते तेव्हा ________ हा अलंकार होतो.

(1) श्लेष (2) अपन्हुती (3) यमक (4) दृष्टांत

---

**21.** 'मी गावाला जात आहे' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार सांगा.

(1) प्रयोजक क्रियापद (2) अकर्मक क्रियापद (3) शक्य क्रियापद (4) संयुक्त क्रियापद

---

**22.** संयुक्त वाक्य व त्याचे उपप्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | समुच्चयबोधक | (i) | मी जाईन नाहीतर जाणार नाही. |
| (b) | विकल्पबोधक | (ii) | गडी माणसांची तेवढी अडचण आहे, बाकी सारे ठीक आहे. |
| (c) | न्यूनत्वबोधक | (iii) | तुला दोन चिंचा दिल्या आणखी किती देऊ ? |
| (d) | परिणामबोधक | (iv) | पाऊस वेळेवर झाला म्हणून पिके चांगली आली. |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

---

**23.** खाली दिलेल्या कोणत्या पर्यायातील शब्दांची रूपे अनेकवचनी होतांना बदलत नाहीत ? योग्य तो पर्याय लिहा :

(1) आंबा, केळ, रताळे, पपई (2) शत्रू, उंदीर, कवी, देव, चिकू

(3) नदी, बी, स्त्री, काठी, भाकरी (4) ससा, कुत्रा, लांडगा, घोडा, म्हैस

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

12. 'एखाद्याचा डाव त्याच्यावरच उलटविण्याचे कृत्य' या अर्थासाठी **अचूक** म्हण ओळखा.

(1) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ
(2) गुरुची विद्या गुरुला फळली
(3) खाई त्याला खवखवे
(4) आपलेच दात आपलेच ओठ

---

13. 'भिकाऱ्याला मी एक सदरा दिला, शिवाय त्याला जेवू घातले'.

या विधानातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा :

(1) विकल्पबोधक (2) समुच्चयबोधक (3) परिणामबोधक (4) स्वरूपबोधक

---

14. 'तुमच्या मुलाला मी अनेकदा बजावले आहे'.

या विधानातील अधोरेखित शब्दाच्या अव्ययाचा प्रकार ओळखा :

(1) प्रकारदर्शक (2) अनुकरणदर्शक (3) निश्चयार्थक (4) परिणामवाचक

---

15. 'प्राचार्यांकडून विद्यार्थ्यांना दंड आकारण्यात आला' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्तृकर्मसंकर प्रयोग
(2) समापन भावे
(3) नवीन कर्मणि
(4) शक्य कर्मणि

---

16. 'पापात्मके पापे नरका जाइजे' हे उदाहरण __________ प्रयोगाचे आहे.

(1) प्राचीन कर्मणी
(2) समापन कर्मणी
(3) नवीन कर्मणी
(4) प्रधानकर्तृक कर्मणी

---

17. अधोरेखित शब्दाची जात अनुक्रमे ओळखा :

(a) तो पक्षी उडाला.

(b) तो स्वत: माझ्याकडे आला.

(i) नाम
(ii) सर्वनाम
(iii) विशेषण
(iv) केवलप्रयोगी अव्यव

**पर्यायी उत्तरे :**

(1) (i), (ii) बरोबर
(2) (iii), (iv) बरोबर
(3) (ii), (iii) बरोबर
(4) (iii), (i) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**24.** भावे प्रयोगात :

(a) क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचनानुसार बदलत नाही.

(b) क्रियापदाचे रूप नेहमी तृतीयपुरुषी नपुसकलिंगी एकवचनी असते.

(c) क्रियापदाचे रूप कर्त्याच्या लिंगवचनानुसार बदलते.

वरीलपैकी कोणती विधाने **अचूक** आहेत ?

(1) (a) आणि (c) (2) (a) आणि (b)

(3) (b) आणि (c) (4) सर्व विधाने

---

**25.** क्रियाविशेषण अव्यये ही :

(a) क्रियेबद्दल विशेष माहिती सांगतात.

(b) क्रियाविशेषण विकारी असतात.

(c) एका वाक्याची दुसऱ्या वाक्याशी सांगड घालतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (c) बरोबर

(3) (a) आणि (b) बरोबर (4) (a) आणि (c) बरोबर

---

**26.** खाली दिलेल्या वाक्प्रचारातून वेगळ्या अर्थाच्या वाक्प्रचाराचा अचूक पर्याय ओळखा.

(1) जीव टांगणीला लागणे (2) जीवास घोर लागणे

(3) जीव मेटाकुटीस येणे (4) जीव भांड्यात पडणे

---

**27.** योग्य जोड्या जुळवा :

| | **विभक्ती** | | **कारक** |
|---|---|---|---|
| (a) | पंचमी | (i) | घराशी |
| (b) | तृतीया | (ii) | घरात |
| (c) | षष्ठी | (iii) | घराहून |
| (d) | सप्तमी | (iv) | घराचा |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

28. पुढीलपैकी कोणता शब्द परभाषीय आहे?

(1) डोंगर (2) दगड (3) लेकरू (4) गाडगे

29. विधानपूरक म्हणजे काय?

(a) कर्ता आणि कर्म क्रियापद या दोन शब्दांनी विधान पूर्ण होत नाही, त्यास आणखी एका शब्दाची गरज असते त्यास पूरक म्हणतात.

(b) सकर्मक धातूचे विधान कर्माशिवाय पूर्ण होत नाही म्हणून कर्मासही पूरक म्हणतात.

(c) क्रियापदामुळे वाक्यास पूर्णत्व येते म्हणून क्रियापदाला विधानपूरक म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (2) (a) व (b) चूक

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (c) बरोबर

30. जोड्या जुळवा :

(a) उपसर्गघटित शब्द (i) बाजारहाट, वरचेवर, कामकाज

(b) प्रत्ययघटित शब्द (ii) गाव, मान, पापड

(c) अभ्यस्त शब्द (iii) संगीत, सुग्रास, प्रवाह

(d) सिद्ध शब्द (iv) भवितव्य, वक्ता, चिंता

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

31. खालील विधाने वाचून 'जीवन' या शब्दाचा एकापेक्षा जास्त अर्थ व्यक्त करणारा पर्याय निवडा.

(a) हे जीवन सुंदर आहे. (b) वास्तवाला अनुभवणे आवश्यक आहे.

(c) पाणी आपल्यासाठी आवश्यक आहे. (d) लौकिकता सर्वश्रेष्ठ आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) (2) (a), (c)

(3) (a), (d) (4) यापैकी काहीही नाही

32. खाली दिलेल्या उदाहरणांतून कृदन्त तत्पुरुष समासाची उदाहरणे असलेला योग्य पर्याय लिहा.
   (1) क्रीडांगण, ऋणमुक्त, राजपुत्र, घरजावई
   (2) दररोज, दरमजल, बिनशर्त, बिनधोक
   (3) मुखचंद्र, चंद्रमुखी, कमलनयन, चरणकमल
   (4) ग्रंथकार, कुंभकार, शेतकरी, कामकरी

---

33. 'उन्नती' या शब्दाला विरोधार्थी शब्द ओळखा :
   (1) अवनिती (2) विकृती (3) प्रगती (4) अवनती

---

34. कर्मणिप्रयोगात कर्तरिप्रयोगाचे मिश्रण होते म्हणून याला ________ प्रयोग म्हणतात.
   (1) कर्म-भाव संकर प्रयोग (2) कर्तृ-कर्म-संकर प्रयोग
   (3) कर्तृ-भाव-संकर प्रयोग (4) पुराण कर्मणि प्रयोग

---

35. 'तो गावोगाव भटकत फिरला' या वाक्यातील अधोरेखित शब्दातील क्रियाविशेषण अव्यय कोणते ?
   (1) साधित क्रियाविशेषण अव्यय (2) सामासिक क्रियाविशेषण अव्यय
   (3) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय (4) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

---

36. 'त', 'थ', 'द', 'ध', 'न', 'ल', 'स' ही सात व्यंजने ________ आहेत.
   (1) ओष्ठ्य वर्ण (2) दन्त्य वर्ण (3) मूर्धन्य वर्ण (4) तालव्य वर्ण

---

37. 'निष्पाप' या शब्दाची संधी ओळखा :
   (1) निष् + पाप (2) नि: + पाप (3) निष + पाप (4) निष्प + आप

---

38. 'मेघासम तो श्याम सावळा' या वाक्यातील अलंकार ओळखा.
   (1) रूपक (2) उपमा (3) श्लेष (4) यमक

---

39. 'तुम्ही पुढे व्हा, मी आलोच.'
   या विधानातील काळ ओळखा :
   (1) वर्तमानकाळ (2) संनिहित भविष्यकाळ
   (3) भूतकाळ (4) अपूर्ण वर्तमानकाळ

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

40. 'तुरग' या शब्दाला समानार्थी शब्द सांगा.
(1) हत्ती (2) ससा (3) घोडा (4) गाढव

41. व्याकरणदृष्ट्या शुद्ध शब्द कोणता ?
(1) अतींद्रिय (2) अतिद्रिंय (3) अतिद्रींय (4) अतीद्रींय

42. दिलेल्या पर्यायांमधून पुढील म्हणीचा अर्थ ओळखा.
'केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी'
(1) भरपूर श्रीमंती असणे (2) अत्यंत गरीब स्थिती असणे
(3) अत्यंत कष्ट असणे (4) खूप आराम असणे

43. 'लवाद' या शब्दाचा अर्थ पुढील पर्यायांमधून निवडा :
(1) स्वत: हून मध्यस्थी करणारा (2) लादला गेलेला मध्यस्थ
(3) उभयपक्षांच्या सहमतीने नेमलेला मध्यस्थ (4) एकतर्फी निर्णय देणारा मध्यस्थ

44. 'वेदा आली' या वाक्यातील क्रियापदाचा खालील कोणता प्रकार नाही ?
(a) सकर्मक क्रियापद (b) द्विकर्मक क्रियापद
(c) अकर्मक क्रियापद (d) उभयविध क्रियापद
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a), (b), (c) (2) फक्त (b), (c), (d)
(3) फक्त (a), (b), (d) (4) फक्त (a), (c), (d)

45. 'दीपाचा चुलत सासरा म्हणजे देवमाणूस आहे' - या वाक्यातील 'चुलत सासरा' हा सामासिक शब्द ________ या समासाचे उदाहरण आहे.
(1) समाहार द्वंद्व समास (2) इतरेतर द्वंद्व समास
(3) मध्यमपदलोपी समास (4) वैकल्पिक द्वंद्व समास

46. विधाने ओळखा :
(a) आजन्म हा अव्ययी भाव आहे. (b) महामानव हा द्वंद्व समास आहे.
(c) तोंडपाठ तत्पुरुष आहे. (d) श्वेतकमल हा बहुव्रीही समास आहे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (b), (d) बरोबर (2) (a), (c) बरोबर
(3) (a), (d) बरोबर (4) (c), (d) बरोबर

**47.** जिथे आकाश जमिनीला टेकल्यासारखे दिसते ती जागा ________.
(1) समुद्र किनारा (2) क्षितिज (3) चौपाटी (4) डोंगरकडा

**48.** 'चंदन करणे' - या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
(1) सत्कर्म करणे (2) नाश करणे (3) आनंद फुलवणे (4) सेवा करणे

**49.** 'कृष्णानेच द्रौपदीची लज्जा राखावी' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.
(1) आज्ञार्थ क्रियापद (2) विध्यर्थ क्रियापद
(3) संकेतार्थ क्रियापद (4) शक्य क्रियापद

**50.** पुढील विधाने वाचा :
(a) भावकर्तृक क्रियापदांना स्वतंत्र, स्पष्टकर्ता नसतो.
(b) अनियमित धातूना आख्यातांचे प्रत्यय लागत नाहीत.
(c) प्रयोजक क्रियापदात कर्ता मूळ धातूतील क्रिया स्वत:च पार पाडतो.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a) चूक (2) सर्व बरोबर
(3) फक्त (b) चूक (4) फक्त (c) चूक

**51.** 'काल म्हणे मुलांनी गडबड केली' या विधानातील अव्ययाचा प्रकार ओळखा.
(1) व्यर्थ उद्गारवाची अव्यय (2) संबोधनदर्शक
(3) प्रशंसादर्शक (4) यापैकी एकही नाही

**52.** एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला सर्वसामान्य नाव दिले जाते त्याला काय म्हणतात ?
(1) सर्वनाम (2) विशेषनाम (3) सामान्यनाम (4) भाववाचकनाम

**53.** 'नानामामांनी आपल्या मुलीला शाळेत घातली' - या वाक्याचा प्रयोग ओळखा.
(1) कर्तृ-कर्म संकर प्रयोग (2) कर्तृ-भाव संकर प्रयोग
(3) कर्म-भाव संकर प्रयोग (4) भाव कर्तरी प्रयोग

**54.** समान अर्थाच्या म्हणी ओळखा :
(a) कांदा पडला पेवात पिसा हिंडे गावात. (b) काखेत कळसा गावाला वळसा.
(c) घरोघरी मातीच्या चुली. (d) हातच्या काकणाला आरसा कशाला.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a), (d) बरोबर (2) फक्त (b), (c) बरोबर
(3) फक्त (a), (c) बरोबर (4) फक्त (a), (b) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

55. समानार्थी म्हण ओळखा :

'जगात बुवा अन् मनात कावा'

(1) तोंड चोपडा नि मनी वाकडा
(2) तण खाई धन
(3) ढोंग धतूरा हाती कटोरा
(4) नाव देवाचे नि गाव पुजाऱ्याचे

---

खाली दिलेला उतारा लक्षपूर्वक वाचून त्यावर आधारित प्रश्न क्रमांक 56 ते 60 ची उत्तरे दिलेल्या पर्यायातून निवडा.

वाढत्या वयाबरोबर येणारे अनुभव व अभ्यास यांनी माणूस हळूहळू गंभीर होत जातो. गतिमानता हा जसा जगाचा नियम, तद्वत बदलत जाणं हा माणसाच्या मनाचा धर्मच आहे. त्याला लताबाई तरी कशा अपवाद ठरतील? त्यांची आजची गंभीरता हेच सांगते. त्यांचं खूप नाव झालं, त्यांना खूप पैसा मिळाला, खूप वैभव प्राप्त झालं, त्यांची खूप प्रशंसा झाली. अती झालं नि हसू आलं असं म्हणतात. आता त्याच प्रशंसेचा, स्तुतीचा, नावाचा, वैभवाचा कंटाळा आला आहे त्यांना, असंच त्यांचं आजचं साधंसुधं, साधन-शुचितेनं परिपूर्ण भरलेलं जीवन सांगतं. त्यांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरं घडली. त्यांनी गरिबीत दिवस काढले. प्रसंगी अर्धपोटीही त्या राहिल्या. तद्वत डोळे दिपवणारं वैभवदेखील त्यांना लाभलं. रंकाचा राव झाला की त्याचे डोळे फिरतात हा सृष्टीचा नियम, पण लताबाईंच्या वागण्यात की स्वभावात फारसा फरक पडलेला दिसत नाही. वैभवाची धुंदी त्यांना कधीच चढली नव्हती की आजही नाही. स्वभावानं त्या अत्यंत मोकळ्या-काहीशा भावनाप्रधान, तद्वत हातानं सढळ-पित्यापासूनच त्यांना हा वारसा मिळालेला. त्यामुळे त्यांच्या या भोळेपणाचा नि उदार वृत्तीचा फायदा अनेकांनी घेतला. गोरगरिबांना, रंजलेल्या-गांजलेल्यांना त्यांनी असंच धन वाटलं आहे. पण त्यांचं हे दान गुप्त असतं. या हाताची त्या हाताला कधी दाद लागू देत नाहीत.

त्यांच्या संपत्तीवर, त्यांनी केलेल्या आर्थिक साहाय्यावर अनेकजण पदवीधर झाले, कित्येकांनी परदेशचा दौरा केला, नि काहीजण आजही वैद्यकीय शास्त्रासारखा विपुल खर्चाचा अभ्यास करीत आहेत. अनेक संस्था, देवालयं, विद्यामंदिरं, स्मारकं नि थोर पुरुषांचे पुतळे उभारण्याच्या कामी त्यांच्या गायनकलेचा उपयोग झाला आहे, प्रत्यही होत आहे; तद्वत त्यांनी अशा कार्यात सढळ हातानं आर्थिक साहाय्यही केलं आहे. अनेकांना त्यांनी आजवर भेटवस्तू दिल्या, कलावंतांची कदर केली, गुणी जनांपुढे त्या नतमस्तक झाल्या. पण त्याची त्यांनी कधी जाहिरात केली नाही, की करणाऱ्यांना ती करूही दिली नाही.

---

56. या उताऱ्यात खाली दिलेल्या वाक्प्रचारांपैकी कोणता वाक्प्रचार आलेला नाही ?

(1) रंकाचा राव होणे
(2) वैभवाची धुंदी चढणे
(3) नत-मस्तक होणे
(4) आर्थिक हानी होणे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

57. या लेखातून शब्दांकित केलेल्या लताबाईंच्या व्यक्तिमत्त्वाविषयी काय म्हणता येईल ?

(1) गुप्तपणे संपत्ती दान करणाऱ्या लताबाई (2) कलावंतांची कदर करणाऱ्या लताबाई

(3) एक विनम्र व्यक्तिमत्त्व लताबाई (4) भारताचा गानकोकीळ लताबाई

---

58. अनेक संस्था, देवालये, विद्यामंदिरे, स्मारके, थोर पुरुषांचे पुतळे उभारण्याच्या कामी लताबाईंच्या ________ उपयोग झाला.

(1) भावनाप्रधान स्वभावाचा (2) गायन कलेचा

(3) प्रशंसेचा (4) कलावंतांची कदर करण्याचा

---

59. लताबाईंना त्यांच्या वडिलांकडून कोणता वारसा मिळाला ?

(1) वैभवाची धुंदी चढल्यावर दुसऱ्यांना तुच्छ लेखणे.

(2) दुसऱ्यांचे डोळे दिपविणारं वैभव प्राप्त करणे.

(3) जीवनात अनेक स्थित्यंतरं घडविणे.

(4) गोर-गरीब, रंजलेले-गांजलेले यांना सढळ हाताने मदत करणे.

---

60. माणूस हळूहळू गंभीर केव्हा होत जातो ?

(1) खूप पैसा, वैभव प्राप्त झालं, खूप प्रशंसा झाली तेव्हा.

(2) अती झालं नि हसू आलं तेव्हा.

(3) वाढत्या वयाबरोबर येणारे अनुभव व अभ्यास यांनी,

(4) प्रशंसा, स्तुती, नाव-लौकिक, वैभव यांचा अतिरेक झाला की,

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**61.** Match the best meanings of the following words :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Investiture | (i) | Too highly respected to be attacked |
| (b) | Invidious | (ii) | Too strong to be defeated |
| (c) | Invincible | (iii) | Tending to cause ill-will |
| (d) | Inviolable | (iv) | Ceremony to give powers |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

---

**62.** Identify the correct sentence :

(a) We have adopted the hotels to suit their needs.

(b) The people adopted him as their Patron Saint.

(c) He has adapted well to his new home.

**Answer options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b)

(3) Only (b) and (c) (4) All

---

**63.** Fill in the blanks with suitable words :

(a) His attack on her honesty offends against the ________ of good taste.

(b) The exhibition displayed a $15^{th}$ century ________.

**Answer options :**

(1) cannon, canons (2) cannon, cannon

(3) canons, cannon (4) cannon, contours

---

**64.** What is the adjective form of the word balcony ?

(1) balconative (2) balconied

(3) balconic (4) balconable

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

65. The workers demand exhorbitant pay scales.

Identify the correct meaning of the underlined.

(1) solid (2) impressive

(3) attractive (4) excessively high

---

66. We are prohibited / to smoke / here. / No error.
(a) (b) (c) (d)

Spot the error(s) in the above sentence. If no error say No error.

**Answer options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b)

(3) Only (b) and (c) (4) (d)

---

67. Choose the **correct** question :

(1) Are you a member in the committee ?

(2) Are you a member of the committee ?

(3) Are you a member on the committee ?

(4) Are you a member at the committee ?

---

68. Fill in the blanks with appropriate words.

(a) Even the most _________ doctors could not cure him.

(b) There is a storm _________.

**Answer Options :**

(1) imminent, eminent (2) eminent, imminent

(3) eminent, eminent (4) eminent, immanent

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

69. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | King | (i) | Proper noun |
| (b) | Action | (ii) | Collective noun |
| (c) | Fleet | (iii) | Abstract noun |
| (d) | Asoka | (iv) | Common noun |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

70. Select the correct sentence/s :

(a) A committee was set up to look at the problem.

(b) She kept on crying in spite of my assurance of help.

(c) We must look upon social evils as nuisance.

(d) His parents looked over with a triumphant smile.

**Answer options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (b) and (c)
(3) Only (a), (b) and (c)
(4) All the above

71. Select the correct adverbial clause :

They started at his departure.

(a) They started when he departed.

(b) They started after his departure.

(c) They started before he departs.

(d) They started before he departed.

**Answer Options :**

(1) Only (a) is correct
(2) Only (b) is correct
(3) Both (a) and (c) are correct
(4) Both (a) and (d) are correct

72. I <u>will</u> teach you a lesson.

Identify the meaning of the modal underlined.

(1) promise (2) command (3) offer (4) threat

73. Match the following :

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | populist | (i) | a person who helps those who are in trouble. |
| (b) | snoop | (ii) | a person who supports popular sentiments and fears. |
| (c) | spy | (iii) | a person who pry into other people's affairs. |
| (d) | philanthropist | (iv) | a secret agent employed to watch others. |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (2) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

74. Identify the error in the following sentence choosing the correct alternative. If there is no error say so.

He talks about / nothing else than / his own affairs : / No error.
(a) (b) (c) (d)

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Only (c) (4) Only (d)

75. Which one of the following explains the phrase :

"One who is a great lover of books" ?

(1) bigot (2) blonde (3) bibliophile (4) bookie

76. Choose the alternative that would complete the expression in capital letters in the following sentence :

The publicity caused by his connection with gangsters was the COUP DE ________ of his election campaign.

(1) Etat (2) End (3) High (4) Grace

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

77. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Let the cat out of the bag | (i) | To cause trouble |
| (b) | Like a cat on hot tin roof | (ii) | To tell a secret |
| (c) | Set the cat among the pigeons | (iii) | Nearly catch someone and then allow to escape |
| (d) | Play cat and mouse with | (iv) | Very nervous |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

---

78. Identify the incorrect part of the sentence below :

He hopes that he hasn't makes a mistake.

(1) Hopes (2) Hasn't (3) Makes (4) That

---

79. Identify the correct sentence :

(a) She denied that she had gone to the movie last night.

(b) She refused that she had gone to the movie last night.

(c) She refused to return the money I lent her yesterday.

(d) She denied to return the money I lent her yesterday.

**Answer options :**

(1) only (a) and (c) (2) only (a) and (d)

(3) only (b) and (d) (4) only (b) and (c)

---

80. She was not a woman to make <u>idle</u> threats.

Identify the correct meaning of the word in the given context :

(1) inactive (2) superficial (3) meaningless (4) redundant

---

81. Which one of the following sentences is correct ?

(1) This premises looks too big.

(2) This premise looks too big.

(3) These premises look too big.

(4) These premise look too big.

---

82. Which of the sentences are equivalent to the following sentence ?

Some poets are at least as great as Tennyson.

(a) Tennyson is not greater than some other poets.

(b) Some poets are not less great than Tennyson.

(c) All poets are as great as Tennyson.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) and (c) only

(3) (a), (b) and (c) (4) (a) and (b) only

---

83. Match the following :

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | One who is always doubting | (i) | stoic |
| (b) | A person indifferent to pleasure and pain | (ii) | pessimist |
| (c) | One who looks only dark side of things | (iii) | cynic |
| (d) | One who is disinclined to believe in goodness | (iv) | sceptic |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

84. He is a very diligent young man, you won't find him wasting his time.

Select the word which is opposite in meaning of the word underlined.

(1) brilliant (2) idle (3) curious (4) inattentive

---

85. Identify the correct sentence :

(a) A thief lurks in the Shadows.

(b) A hunter walks through the jungle for hunting down an animal.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

86. Match the following :

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | incapable of being corrected | (i) | unintelligible |
| (b) | incapable of being understood | (ii) | illegible |
| (c) | one too strong to overcome | (iii) | incorrigible |
| (d) | incapable of being read | (iv) | invincible |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

---

87. Identify the incorrect sentence/s.

(a) A course of lectures was delivered.

(b) Silver as well as gold is used for ornaments.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

88. Choose the correct pronouns to fill in the blanks :

(a) Every student passed ________ examination.

(b) Everyone had to show ________ ticket.

(c) We have lost ________ dog.

**Answer options :**

(1) his, his, our (2) their, his, our (3) his, their, our (4) his, his, ours

---

89. Choose the correct synonym for - Knack :

(1) Aptitude (2) Jack (3) Snacks (4) Things

---

90. Identify the sentence/s grammatically incorrect.
   (a) Raju completes his course next year.
   (b) We have just eaten two mangoes.
   (c) I have studied this topic for three hours.

   **Answer options :**

   (1) Only (a) (2) Only (b)
   (3) Only (c) (4) None the above

---

91. Choose the correct sentence :
   (1) The costs of all necessaries has gone up.
   (2) The cost of all necessaries has gone up.
   (3) The cost of all necessaries have gone up.
   (4) The costs of all necessaries have went up.

---

92. Select the correct synonyms of spurious :
   (a) false (b) imaginary
   (c) magnificent (d) unproductive

   **Answer Options :**

   (1) only (a) and (d) (2) only (d) and (c)
   (3) only (b) and (d) (4) only (a) and (b)

---

93. Choose the best option to fill in the blank.
   They are _________ the new Manager to bring the company back to profitability.
   (1) looking to (2) looking at (3) looking for (4) looking about

---

94. Identify the sentence grammatically correct :
   (1) We knew that India would win the match.
   (2) We knew that India will win the match.
   (3) We know that India would win the match.
   (4) We knew that India can win the match.

---

95. Identify the correct sentences :
   (a) Two pounds of coffee cost seven and sixpence.
   (b) The furnitures are to be delivered today.
   (c) He gave me many good advices.

   **Answer Options :**

   (1) (a) only (2) (b) and (c) only
   (3) (a), (b) and (c) (4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**Read the following passage carefully and answer Q.No's 96 to 100 based on it.**

It is very important to remember especially now when we have regained our freedom from British rule, that it was contact with western ideas that made our own people wake up and work for a new India. Many great men and women have worked for the making of the new India in many different ways. They had different ideas of what the new India should be. Some wanted to reform the Hindu religion by getting rid of idol-worship, caste and other ideas which were not in the Hindu religion of ancient times. Swamy Dayanand, who founded the Arya Samaj, had this aim. Others wanted to get rid of old ideas completely and make India a modern country, with the help of scientific knowledge gained from the west. Some wanted to bring about changes more slowly, by spreading education through newspapers and schools. But all these people got their ideas through hearing or reading about the changes which had been taking place in Europe and America. They got to know about these changes from people who came to India from the west, first to trade with them, and then to rule over them. They did not like being ruled over by foreigners, but they could not help seeing that unless they got the new knowledge which the foreigners had, they would not be able to make a new India and rule it themselves.

---

96. How did Indians respond to the foreigners who came to India ?
    (1) Indians offered warm hospitality to the foreigners.
    (2) Indians isolated themselves from the foreigners.
    (3) Indians disliked being ruled over by foreigners.
    (4) None of the above.

---

97. Why did some people want to get rid of idol-worship ?
    (1) It posed the threat of pollution.
    (2) It was not part of ancient Hindu religion
    (3) All people were not able to afford idols.
    (4) There was lack of manpower to manufacture idols.

---

98. Which of the following is true in the context of the passage ?
    (a) Western ideas proved useful for making a new India.
    (b) Swamy Dayanand wanted to establish an anti-Hindu religion.
    (c) It was not possible to make a new India without new knowledge.

    **Answer options :**

    (1) (a) and (b) only    (2) (b) and (c) only
    (3) (a) and (c) only    (4) (a), (b) and (c)

---

**99.** What did the people from west do with Indians ?

(1) First adopted Indian customs and afterwards made Indians accept their customs.

(2) First traded with Indians and afterwards ruled over them.

(3) First showed leniency towards Indians and afterwards became harsh to them.

(4) First visited Indian temples and afterwards invited Indians to visit their churches.

---

**100.** Which of the following are true in the context of the passage ?

(a) There were different ideas of making a new India.

(b) Some people preferred slow changes.

(c) Changes in Europe and America influenced the making of a new India.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**सूचना** — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK